गुरूवार ३० जानेवारी २०२५

नम्रता आणि सद्गुणांनी जीवन अधिक सुंदर होते.

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक : १३५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# महसूल अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय भेटीत कुचराई केल्यास शिस्तभंगाची कारवाई!

## जिल्हाधिकारी महिन्यातून एकदा, एसडीओ–तहसीलदार दोनवेळा क्षेत्रीय भेट देणार महसूल मंत्री बावनकुळे स्वत: आढावा घेणार

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील महसूल यंत्रणा लोकाभिमुख करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट परिपत्रक जारी करून जिल्हाधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी दोनवेळा आपल्या क्षेत्रात दौरा करून आपल्या विभागातील शासकीय ध्येयधोरणे व योजना जनतेपर्यंत पोहोचतात की नाही याचा वस्तुनिष्ठ अहवाल द्यावा असे म्हटले आहे. या कामात कोणी कुचराई केल्यास शिस्तभंगाची कारवाई विनाविलंब केली जाईल असेही बजावण्यात आले आहेत.महसूल मंत्री बावनकुळे यांनी महसूल विभागातील वरिष्ठ



अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना परिपत्रकाबद्दलची संपूर्ण माहिती दिली. जारी करण्यात आलेल्या परिपत्रकात मुख्यमंत्र्यांच्या या संदर्भातील निर्देशांचा स्पष्ट उल्लेख केला आहे. या भेटीदौऱ्यांचे मॉनिटर करण्यासाठी ऑनलाइन प्रणाली तयार करून त्याद्वारे दौऱ्याचे नियोजन करून विभागीय आयुक्त कार्यालयाने या संदर्भात समन्वय राखावा अशा सूचना दिल्या आहेत.

**तेरा कलमी कार्यक्रम**

महसूल व वन विभागाच्या या परिपत्रकात क्षेत्रीय भेटींचा १३ कलमी कार्यक्रम अधिकाऱ्यांना आखून देण्यात आला आहे. महसूल अधिकाऱ्यांनी भेटी देऊन, पाहणी करून जनतेशी संवाद साधून जनतेचे अभिप्राय नोंदवावेत. नैसर्गिक आपत्तीप्रवण भागात आपत्ती काही टाळता येईल याची उपाययोजना करून मंत्रालयास सूचना करावी.

**अचानक भेट तंत्र वापरा**

गावपातळीवर कर्मचारी व अधिकारी कामकाज करत आहेत की नाही याची खातरजमा अचानक तंत्राचा (आकस्मिक भेटी) वापर करून यंत्रणा सतर्क करावी. या भेटी देताना ई–ऑफिस प्रणाली, सेवाहक्क कायदा पोर्टल, आपले सरकार पोर्टल, पीजी पोर्टल, इम्युटेशन, ई–पीकपाणी तसेच, सेतू कार्यालयासहित महसूल विभागातील सर्व ऑनलाइन सेवांचा वापर कटाक्षाने केला जातो की नाही याचा आढावा घ्यावा. स्वच्छता, सुविधा, कार्यालयासमोर नामफलक, नागरिकांची सनद व उपलब्ध सुविधा, अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक यांची नोंद, जनतेच्या तक्रारी व निराकरण महसूल वाढीसारठी प्रयत्न याबाबत लक्ष द्यावे. अधिकारी व कर्मचारी जनतेशी सौजन्यपूर्ण वागतो की नाही याची माहिती संवेदनशीलतेने घ्यावी. तसेच, १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाचाही वेळोवेळी आढावा घ्यावा अशा सूचनाही या १३ कलमांमध्ये आहेत.

**राज्याची धोरणे, लोकाभिमुख योजना, उपाययोजना, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल विभागाने पुढाकार घेतला असून, जिल्हाधिकारी ते कोतवाल अशा सर्व स्तरांवर नियोजन व अंमलबजावणी सुरू ठेवण्यासाठी महसूल यंत्रणा त्यांच्या कार्यक्षेत्रात सक्रिय असली पाहिजे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांसह सर्व यंत्रणा त्यांच्या भागात फिरस्तीवर असली पाहिजे हा यामागचा उद्देश आहे. विभागीय आयुक्तांनी पाठवलेल्या अहवालावर आपण स्वत: लक्ष देणार असून, त्याची नोंद सेवापुस्तिकेत घेतली जाईल.**

# दौंड वनखात्याची परवानगी न घेता वनक्षेत्रातुन पाईप लाईनची खोदाई

## ठेकेदारावर कारवाई करण्याची ग्रामस्थांची मागणी!

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**दौंड (बबनराव धायतोंडे)**

दौंडच्या राजेगाव – स्वामी चिंचोली सीमेलगत कानोबाच्या डोंगराशेजारी वनखात्याची जमीन असून याठिकाणी ठेकेदार अमोल नलावडे यांनी परवानगी न घेता जलजीवन योजने अंतर्गत स्वामी चिंचोली गावासाठी पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन खोदाईचे काम सुरू केले आहे.याकडे वन अधिकारी डोळे झाकून बसले आहे.पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील राजेगाव,स्वामी चिंचोली गावासाठी जलजीवन पाणी पुरवठा योजना ही पंधरा कोटीं रूपयांची योजना असून सदरचे खोदाई काम चालू आहे. या योजनेची पाईपलाईन वनखात्याच्या हद्दीतून जात असताना कुठलीही परवानगी संबंधित ठेकेदार यांनी घेतलेली नाही. एरवी मात्र छोट्या छोट्या



घटनांवर कारवाई करणारे वन अधिकारी यावेळेस मात्र ठेकेदार हे वनखात्याचे जावई असल्यासारखे का वागत आहे, हे येथील ग्रामस्थांना पडलेले मोठे कोडे आहे.ङ्गमागील काही दिवसांपूर्वी मलठण ता.दौंड येथे वन परिक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली होती,याच संबंधित ग्रामस्थांनी आणि पत्रकारांनी हा मुद्दा उचलून धरल्याने येथील तिन वन अधिकारी निलंबित झाले होते.अशाच प्रकारची कारवाई किंवा ठेकेदारावर गुन्हा दाखल होणार का ?अशी चर्चा स्वामी चिंचोली आणि राजेगाव परिसरात रंगू लागली आहे.

# दुसरबीड येथे सैनिक बाबुराव विणकर यांचे सेमिनार



■ लोकनेता न्युज नेटवर्क

**सिंदखेड राजा :–** पंचकृषीतील सैनिक बाबुराव विणकर यांचे सेमिनार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण ठरतं आहे. शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन या जन्म भूमी व समाजाचे आपण काही देणं लागतो आणि ते आपण दिलेच पाहिजे असे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन मागील १५ वर्षा पासून बाबुराव विणकर जेव्हा रजेवर येतात तेव्हा महापुरुषांचे विचार सामाजिक कार्य लोकांच्या मनावर बिंबवतात जयंत्या उत्सव साजरे करतात. विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास कसा साधता येईल ते सेमिनारच्या माध्यमातून सांगतात नुकत्याच दुसरबिड येथे आयोजित भार्ती पूर्व तयारी प्रशिक्षण केंद्राचे संचालक मा. गजानन राठोड व भूषण घेवंदे यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या सेमिनार मध्ये .तालुक्यातील १० ते १५ गावच्या विद्यार्थ्यांना विणकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

**अभ्यास का आणि कश्यासाठी करायचा ?**

१) सोशियाल मीडिया विद्यार्थ्याला लागलेलं व्यसन.

२ )ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची दशा आणि दिशा

३,) व्यसन मुक्तता

४,) समाजकारण

५) डिसिप्लिन आणि सेल्फ डिसिप्लिन

६,) चरित्र आणि आत्मचरित्र

७) शिक्षणाचे महत्व अश्या अनेक विषयावर मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

# राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्नित पर्यवेक्षिका संघाच्या राज्य अध्यक्षपदी अंजली देशमुख

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**चिखली :–** महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ केंद्रिय कार्यकारणीच्या १८ जाने. २०२५ च्या ऑनलाईन बैठकीतील निर्णयानुसार बापूसाहेब ससाणे, महासचिव कास्ट्राईब महासंघ महाराष्ट्र या मान्यता प्राप्त कर्मचारी संघटनेची संलग्न शाखा असलेल्या कास्ट्राईब पर्यवेक्षिका संघ, महाराष्ट्रच्या नियम व अटींच्या अधिन राहून राज्य



अध्यक्षपदी अंजली पंडीतराव देशमुख (पर्यवेक्षीका, चिखली जि. बुलढाणा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर राज्य सचिव पदी उज्वला गोविंदराव पवार (पर्यवेक्षिका, दापोली जि. रत्नागिरी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीनंतर चिखली तालुका कार्यालयातील अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी अंजली देशमुख यांचे निवडीचे स्वागत केले आहे.

# शिव न्युट्रीशन सप्लीमेंट "हेल्थ स्टोअर" चे आ.धस यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न...!

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**आष्टी(अण्णासाहेब साबळे)**

धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य पोषण (न्युट्रीशन) आणि नियमित व्यायाम यावर लक्ष केंद्रित केल्यास आपण तंदुरुस्त राहू शकतो. संतुलित आहारासोबत दररोज किमान काही वेळा व्यायाम करण्याचा प्रयत्न करावा,ज्यामुळे शरीर फिट राहील आणि ऊर्जा वाढेल.आष्टी शहरात शिव न्युट्रीशन सप्लीमेंट ''हेल्थ स्टोअर'' च्या उद्धाटनप्रसंगी आ.धस म्हणत होते.चित्रपटातील एखाद्या हिरोसारखी आपलीही सिक्सपॅक शरीरयष्टी असावी,असे तरुणांना नेहमीच वाटते.परंतु त्यासाठी आपल्याला जिम बरोबर प्रोटीन व्यायामशाळेत (जीम) जाऊन भरपूर व्यायाम करणे,तेथील प्रशिक्षकांनी दिलेल्या सल्ल्यानुसार आहार घेणे गरजेचे आहे.लाखात एखादी व्यक्ती जिम करताना मृत्यू होतो.यामुळे दुर्लक्ष न करता वयानुसार आपल्या सर्वांच्याच न्युट्रिशिनल गरजा वेगवेगळ्या असतात.याच्या अनुसारच सर्वांनी आपल्या फिटनेससाठी योजना आखल्या पाहिजेत.फिटनेस राहण्यासाठी दररोज किमान १ तास जीम करुन सोबत न्युट्रीशन घ्या असा सल्ला आ.सुरेश धस यांनी दिला ते क–हेवडगाव येथील सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक परिवंत गायकवाड यांचे चिरंजीव जयदीप गायकवाड यांच्या शिव न्युट्रीशन सप्लीमेंट ''हेल्थ स्टोअर'' च्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.पुढे बोलताना आ.धस म्हणाले की आजकाल धावपळीच्या जीवनात आजारांचा धोका वाढत आहे.त्यामुळे नागरीकांनी आरोग्याबाबत जागरूक राहिले पाहिजे निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी दिवसातून किमान १ तास तरी व्यायामासाठी दिला पाहिजे मी देखील दररोज ३० मिनिटे जीम करतो वास्तविक जीम मध्ये व्यायाम करणे फायद्याचे मानले जाते त्यामुळे नागरीकांनी दररोज जिम करुन सोबत न्युट्रीशन घेतले पाहिजे लाख २ लाख लोकात एखादी घटना घडते की जीम करताना मृत्यू झाला परंतु यामुळे फिटनेस कडे दुर्लक्ष न करता बाकीच्या लोकांनी जिम करुन प्रोटीन सह सकस आहार घ्यावा सकाळीच जेवन राजासारख असल पाहिजे तर दुपारी साधारण संध्याकाळी भिकारी म्हणजे ज्याला मिळत नाही असे जेवन केले पाहिजे असा आ.सुरेश आण्णा धस यांनी सल्ला दिला तसेच याचं वेळी..दि.२६ जानेवारी रोजी शिव न्युट्रीशन सप्लीमेंट हेल्थ स्टोअर,चे आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्धाटन संपन्न झाले. यावेळी ॲड.वाल्मिक तात्या निकाळजे, मा.जि.प.सदस्य सतिश आबा शिंदे,मा. सभापती बद्रीनाथ जगताप,आरपीआय तालुकाध्यक्ष अशोक साळवे,नगरसेवक अरूण भैय्या निकाळजे,सभापती रमजान तांबोळी,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,डॉ शिवाजी राऊत,सरपंच पडाराजे बुरूडे,मा.सरपंच गंगाधर गायकवाड,बाजार समीतीचे गळगटे साहेब,अविनाश कांबळे,कुलदिप गंगावणे,यशवंत खंडागळे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,नगरसेवक सुरेश वारंगुळे, माजी नगरसेवक दिपक निकाळजे,प्रा निखिल मिलिंद निकाळजे, अमोलराजे शिंदे,अफसर शेख, शशिकांत कन्हेरे, जावेद शेख,अस्ताक शेख,अरूण सायकड,सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक मिलिंद निकाळजे, दिलीप राऊत,राजाभाऊ निकाळजे, संजय मेहेर,राजेंद्र मेहेर,नवनीत कासवा,बाळासाहेब गोल्हार,महेंद्र घोडके,डॉ युवराज तुपारे,राजेंद्र बोराडे,अरूण कांबळे,विठ्ठल नरवाडे,रूपेश निकाळजे,ॲड किशोर निकाळजे,कुणाल निकाळजे,इंजिनिअर गहिनीनाथ सिरसाठ,सादिक कुरेशी,सरपंच अजित घुले,सुधीर पठाडे,मा.सरपंच राम आप्पा



धुमाळ,नवनाथ नागरगोजे, केशव बांगर,भगवान सांगळे, रावसाहेब पाटील नागरगोजे,शरद खांडवे, जालीदर खांडवे,शुभम खांडवे, गणेश टकले,बाळासाहेब खांडवे, डॉ मच्छिंद्र खांडवे,अरूण खांडवे, हनुमान गायकवाड,संजय गायकवाड,बाळु गायकवाड,कुमार गायकवाड,आजिनाथ सांगळे, परमेश्वर सांगळे,ज्ञानेश्वर विधाते, हरि टकले,विनोद ससाणे,संतोष बोराडे, श्रीरंग सातपुते,महेश गायकवाड,दत्तु गावडे,ॲड प्रविण डोंगरे,अमर शेख, पत्रकार मैनुद्दीन तांबोळी,पत्रकार उत्तम बोडखे,पत्रकार अविनाश कदम, पत्रकार प्रविण पोकळे,पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी,पत्रकार अविशात कुमकर,पत्रकार अण्णासाहेब साबळे,पत्रकार शरद गर्जे,पत्रकार अक्षय विधाते,पत्रकार संतोष नागरगोजे,सलवार शेख,बळी खांडवे,श्रीधर खांडवे,लक्ष्मण बांगर,राज राऊत,राजेंद्र बोराडे, सचिन ससाणे,फेरोज शेख,दादा सानप, सुधीर बचाटे आदी मान्यवर,मित्र मंडळ,गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री खंडोबा देवस्थान कोळसा यात्रे निमित्त भव्य कुस्ती चे आयोजन.

■ लोकनेता न्युज नेटवर्क



**सेनगाव (महादेव हरण):-**
कोळसा येथील श्री खंडोबा देवस्थान यात्रे निमित्त २८ जानेवारी २०२५ रोजी भव्य कुस्ती चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री अशोकराव नाईक (शिवसेना शहर प्रमुख हिंगोली) व प्रमुख पाहुणे म्हणून परमेश्वरजी मांडगे (उपजिल्हाप्रमुख शिवसेना) विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा तालुकाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी श्री भास्करराव बेंगाळ साहेब, संस्थेचे सचिव अंकुशराव बेंगाळा, खंडबाराव काचगुंडे,गणेशराव पवार,भगवानराव काचगुंडे (कुस्ती संघटक),सचिन दराडे (सामाजिक कार्यकर्ते) आजमभाई (करमाळा महाराष्ट्र केसरी २०१८), पहेलवान मोहम्मद शब्बीर गादीवाले,अण्णासाहेब देवळे, (वस्ताद परभणी),शेषराव महाराज, यादवराव थिटे(चेअरमन वटकळी),पंच अजिसभाई खुडज,अमृतराव शिंदे (तंटामुक्ती अध्यक्ष,वटकळी), ही मान्यवर मंडळी उपस्थित होती.ङ्ग यावेळी श्री खंडोबा देवस्थान यात्रा कमिटी कोळसा मा श्री भास्करराव बेंगाळ साहेब, नसीब भाई,श्री बबनराव पाटील, श्री मल्हारी पावडे, पुजारी मंचकराव बेंगाळ,श्री शंकर मसुडकर, रशीद खाँ पठाण, श्री कडूजी भगत, श्री गंगारामजी मुंठे, श्री रामप्रसाद भगत (सरपंच कोळसा),श्री काशीरामजी बेंगाळ, श्री विलास वाव्हळ (चेअरमन कोळसा),तसेच ग्रामपंचायत कार्यालय,सोसायटी चेअरमन,सदस्य कोळसा, गावकरी मंडळी कोळसा.यावेळी भव्य कुस्तीचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पहिल्या बक्षीसाचे मानकरी विजय शिंदे वारा वाशिम, दुसरे बक्षीस महेबुब वासीम, गणेश जाधव, तिसरे बक्षीस गणेश वासीम व विजय जवळा बाजार ,पांडुरंग टाकळी धनगर व अभिषेक जयपूर,सचिन औंढा,करण वासीम व पांडुरंग परभणी,चौथे बक्षीस तय्यब पठाण व हनुमान बुथनर,ङ्ग या सर्व कुस्ती पहेलवानांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थीत पत्रकार प्रदीप वाघ,फारुख भाई, गजानन पवार, पंच म्हणून आक्रमक खाँ पठाण,मनोहर बांगर, प्रकाश पाटील, प्रताप देशमुख ,कुस्तीचे निवेदक पहेलवान भालचंद्र रणशूर, भगवान काचगुंडे, यांनी कुस्तीचे प्रमुख पंच म्हणून भूमिका पार पाडली. पत्रकारांनी उपस्थीत राहून श्री खंडोबा देवस्थान यात्रा कमिटी,कोळसा ला सहकार्य केले.यावेळी पंच क्रोषीतील कुस्ती प्रेम उपस्थीत होते.




संजय गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्वगुणसंपन्न ,कला विज्ञान तंत्रज्ञान विषयात सखोल ज्ञान असणारे, राज्यशास्त्र विषयात सेट, नेट, गेट परीक्षा उत्तीर्ण असणारे ,अर्थशास्त्राचे अर्थतज्ञ डॉ दिपक भालेराव यांना शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी पिएचडी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)

## वाचनालयात सामूहिक वाचनाचे आयोजन.

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**भोकर/माधव नागलवाड**
वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत सामूहिक वाचन कार्यक्रमाचे आयोजन स्वामि विवेकानंद सार्वजनिक




वाचनालय रिठा येथे करण्यात आले होते. तरुण पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे. ही बाब लक्षात घेता राज्याच्या उच्च तंत्रशिक्षण विभागाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या उपक्रमांमुळे राज्यातील विध्यार्थ्याना अभ्यासक्रमा व्यतिरिक्त अंवतर पुस्तकवाचनाच्या प्रवाहात आणण्याचा मानस राज्य सरकारने आखला आहे.स्वामि विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिठा येथे वाचन संकल्प महाराष्ट्रा या उपक्रमांतर्गत जि.प.प्रा.शाळा रिठा येथील विद्यार्थ्यानी उपस्थिती नोंदवली.ग्रंथ प्रदर्शनाचा गावकरी मंडळीनी लाभ घ्यावा अशी विनंती वाचनालयाचे कार्यवाह माधव नागलवाड यांनी केली.

# लोहा कंधार मधील विविध विकास कामांचा आढावा प्रलंबित कामे नियोजित वेळी पूर्ण करण्याच्या प्रशासनाला सूचना

■ लोकनेता न्युज नेटवर्क





**नांदेड बाजीराव गायकवाड**
लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील विविध शासकीय योजनांची कामे नियोजित वेळेत पूर्ण करा लाभार्थ्यांना प्रत्येक योजनेचा लाभ मिळाला पाहिजे यासाठी काटेकोरपणे नियोजन करा अशा सूचना घेतलेल्या आढावा बैठकीत प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या.

नांदेड येथील जिल्हा नियोजन भवनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब होते. यावेळी विविध विभागाचे विभाग प्रमुखही बैठकीला उपस्थित होते.कंधार आणि लोहा येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नूतन इमारतीच्या बांधकामाचा आढावा घेऊन गऊळ येथील लाल कंधारी संशोधन केंद्राचा आढावाही त्यांनी यावेळी घेतला . याच बैठकीत जलसंपदा विभागाच्या विविध कामांचा आढावा घेतला. राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकासोबतही बैठक घेतली असून या बैठकीत कंधार बस स्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापर्यंत एसटी बस सोडण्यासाठी त्यांनी सूचना केल्या . उस्माननगर येथे येणारी प्रत्येक एसटी बस उस्माननगर गावातील बस स्टँड पर्यंत सोडण्यासाठी त्यांनी संबंधिताला सूचना दिल्या.शिराढोण - नांदेड एसटी बस हमप स्वामी सभागरापर्यंत सोडण्यात यावी आणि उदगीर जांब - दिग्रस- कंधार - पांगरा -उस्माननगर फाटा ही एसटी बस शिराढोण गावापर्यंत सोडावी अशा सूचना यावेळी दिल्या. याशिवाय कंधार - लोहा विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल , उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार , कंधार च्या प्रभारी तहसीलदार आयएएस अधिकारी अनुष्का शर्मा , निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर , लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर , धोंड प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता गरुड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे , उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार , जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता चोपडे , सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गलधर , कार्यकारी अभियंता मुगदल , कार्यकारी अभियंता चौगुले, कार्यकारी अभियंता बनसोडे, जलसंधारण अधिकारी कांबळे , भोजराज , राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक वडदकर यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# वाघोलीत पुणे नगर रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर सर्जिकल स्ट्राईक

■ लोकनेता न्युज नेटवर्क




**वाघोली (संतोष कदम)**
वाघोलीतील दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी कोणत्याही भागात अतिक्रमण होत असेल, तर त्याठिकाणी अतिक्रमण करणाऱ्यांवर सर्जिकल स्ट्राईक करा, असे स्पष्ट निर्देश पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पोलिस दलासह महापालिकेला दिले होते.मंगळवारी या संदर्भात स्थानिकांसह महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली होती.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी हवेली मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी वाघोली परिसरातील वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने समस्या आणि उपाय योजना याबाबत संयुक्तिकरित्या पाहणी केली होती . यावेळी पुणे महापालिका, पीएमआरडीए, पीडब्ल्यूडी, महावितरण, आरटीओ यांचे अधिकारी सुद्धा उपस्थित होते. पोलीस आयुक्तांनी वाघोली परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या.आणि संबंधित विभागांना पूर्तता करून घेण्याबाबत सूचना यावेळी दिल्या होत्या.

याच अनुषंगाने वाघोलीत गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने वाढत असलेली अतिक्रमणे अखेर महानगरपालिकेने बुधवारी दुपारनंतर जेसबी मशिनच्या साह्याने हटविली. पुणे नगर रोडवरील अतिक्रमणे काढण्यास पोलिस बंदोबस्तात प्रारंभ करण्यात आला.

बहुतांश दुकाने अक्षरशः भुईसपाट केल्याने व्यापार्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याने निराशेचा सूर उमटला.

दुपारनंतर महानगरपालिकेचे अतिक्रमण विरोधी विभागासह पोलिसांच्या फौज फाट्यासह वाघोली येथील पुणे नगर रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली. पोलिसांचा मोठा बंदोबस्त असल्याने कोणीही फारसा प्रतिकार केला नाही. जेसीबी, फायर फायटरची गाडी व नगरपालिकेचा इतर स्टाफ यांच्या सहकार्याने अतिक्रमण मोहीम राबविली गेली . यावेळी रस्त्यावर बघ्यांची मोठी गर्दी दाटली होती.

मोहीम सुरू झाल्यानंतर साहित्य हलविण्यासाठी संपूर्ण कुटुंबच रस्त्यावर उतरल्याचे चित्र दिसले.

अतिक्रमणे काढताना काही ठिकाणी किरकोळ वाद झाला. काहींनी विरोध केला, मात्र पोलिसांनी सगळ्यांना दूर करीत अतिक्रमणे काढली.




## एस.टी भाडेवाढी विरोधात यवतमाळ विभागात महागांव बस स्थानकासमोर ठाकरे सेनेचा चक्काजाम

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**महागाव विजय थोरात**
महागाव बस स्थानक येथे आंदोलन. एसटी भाडे वाढीच्या विरोधात ठाकरे गट झाले आक्रमक. महागाव तालुक्यात सेनेच्या कार्यकर्त्यांनी २८ जानेवारी रोजी महागाव बस स्थानक येथून येणाऱ्या जाणाऱ्या नांदेड पुसद माहूर यवतमाळ एस टी महामंडळाच्या गाड्या अडवून गोरगरीब जनतेसाठी आवाज उठविला एकीकडे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले जातात तर दुसरीकडे एसटी बसेस चे भाडेवाढ करून सामान्य जनतेच्या खिशाला कात्री लावण्याचे काम हे सरकार करीत आहे.असा आरोप ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी महागाव बसस्थानक येथे केला.

# कुंभारगावच्या मच्छीमारांची चोरी करणारे मासे भिगवण पोलिसांच्या जाळ्यात

**जी पी आर एस मुळे आरोपी जाळ्यात**

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**भिगवण :**
**(बबनराव धायतोंडे)** :- भिमा नदी पात्रात मासेमारी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मच्छीमारांच्या बोटींचे इंजिन चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना भिगवण पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी ४ बोट इंजिन, एक लोखंडी बोट व इतर साधणे असा ८ लाख ३० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशी माहिती भिगवण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांनी दिली.ङ्गआरोपी दत्तु हिरामन घटे,(वय-३८),रमेश हिरामन गव्हाणे,(वय ३७),रा.दोघेही वरखडे,ता.नेवासा,जि.अहिल्यानगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.सी.सी.टी.व्ही. फुटेज, जी.पी.आर.एस व गोपनियङ्गबातमीदार यांच्या मदतीने आरोपींना अटक करण्यात आली आहे.ङ्गपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुंभारगाव, धुमाळवाडी,(ता.इंदापुर) गावच्या हद्दीतुन भिमा नदीच्या पात्रामध्ये अनिल नामदेव धुमाळ (रा.कुंभारगाव, ता.इंदापुर) यांच्या मालकिची मासेमारी करण्यासाठी वापरणारी ५ एच पी १६० सी.सी. बोटचे इंजिन कोणीतरी आज्ञात व्यक्तींनी नेहल्याची घटना सोमवारी (ता.२७) सकाळी उघडकीस आली होती. याप्रकरणी धुमाळ यांनी भिगवण पोलीस ठाण्यात इंजिन चोरी झाल्याची तक्रार भिगवण पोलीस ठाण्यात दिली होती. सदर घटनेचा भिगवण पोलीस तपास करीत असताना सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपी यांचे सी.सी.टी.व्ही.फुटेज, जी.पी.आर.एस व गोपनिय बातमीदार यांच्या मदतीने माहीती काढुन दत्तु घटे व रमेश गव्हाणे यांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले.त्याच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली.तसेच अधिक चौकशी केली असता त्यांनी इतर गुन्हे केल्याची कबुली दिली. दरम्यान,सदर गुन्ह्यातील आरोपी यांच्याकडून चोरीस गेलेले ४ बोट इंजिन, १ लोखंडी बोट व इतर साधणे असा ८ लाख ३० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे एका मच्छीमाराने होडीच्या इंजिनमध्ये जी पी आर एस मशीन लावण्याने तात्काळ गुन्हेगार शोधण्यासाठी मदत झाल्याने या



मच्छीमाराचे पोलिसांनी विशेष कौतुक केले.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली भिगवण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे,पोलीस उपनिरीक्षक प्रविण जर्दे,पोलीस अंमलदार विठ्ठल वारगड,पांडुरंग गोरवे,सुभाष गायकवाड, प्रसाद पवार,सचिन पवार,रणजित मुळीक,यांनी केली आहे.गुन्हयाचा पुढील तपास पोलीस अंमलदार विठ्ठल वारगड करीत आहेत.

# पंतप्रधान आवास योजनेच्या प्रलंबित अनुदानाचा विषय थेट पंतप्रधान कार्यालयात गाजणार!

## आनंद पाटील तुपदाळे यांची माहिती.

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**माहूर :प्रतिनिधी**

पंतप्रधान आवास योजने च्या लाभार्थ्यांना प्रलंबित अनुदान तात्काळ द्या अशा मागणीचे निवेदन काँग्रेस जिल्हा सरचिटणीस आनंद पाटील तुपदाळे यांच्या नेतृत्वात शेकडो लाभार्थ्यांच्या उपस्थितीत माहूर नगर पंचायत मुख्याधिकारी विवेक कांदे यांना आज दि. २१ रोजी देण्यात आले आहे.

गरिबाना हक्काचा निवारा मिळावा या उद्दात हेतूने मोठा गाजावाजा करून सुरु करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेच्या अडीच लाखां पैकी १ लाख १० हजार रु. १५०० लाभार्थ्यांचे अनुदान सन २०१७ पासून रखडले असल्याने काँग्रेस चे जिल्हा सरचिटणीस आनंद पाटील तुपदाळे यांनी हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर व नांदेडचे खासदार रविंद्र चव्हाण यांच्या मार्फत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पर्यत पोहचविले असून या बाबत संसदेच्या सत्रात प्रश्न उपस्थित करणार असल्याचे खा.नागेश पाटील व खा. रवींद्र चव्हाण यांनी सांगितले आहे. एवढेच नव्हे तर पंतप्रधान कार्यालयात भेट घडवून आणून सदर प्रश्न निकाली काढण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

पंतप्रधान आवास योजनेत राज्य सरकार व केंद्र सरकारच्या निधीतून घरकुल लाभार्थ्यांना २ लाख ५० हजार अनुदान देण्याची तरतूद आहे. सन २०१७ पासून आज पर्यत जवळपास १ हजार ५०० लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर झाले.

अनेक लाभार्थ्यांनी निवास करीत असलेली जुने घरे पाडून मंजूर घरकुलाचे बांधकाम सुरु केले. सुरुवातीला काही हप्ते लाभार्थ्यांना नियमित हप्ते सुद्धा मिळाले. आजतागायत लाभार्थ्यांना केवळ १ लाख ४० हजार रुपये अनुदान मिळाले असून उर्वरित १ लाख १० हजार रुपये अजूनही प्रलंबित आहेत. याबाबत स्थानिक नगर पंचायत सह नगरविकास विभाग मंत्रालया पर्यत पाठपुरावा केला विविध आंदोलने व आमरण उपोषणे केली. परंतु अद्यापही रखडलेल्या अनुदानाचा प्रश्न प्रलंबित आहे. नगर पंचायत प्रशासनास निधी आला की लगेच वितरीत करू एवढेच आश्वासन देत आहेत. त्यामुळे आता थेट पंतप्रधान कार्यालय गाठून तिथेच माहूर तीर्थक्षेत्रातील घरकुल लाभार्थ्याची कैफियत सादर करणार असल्याने न.प. च्या वतीने करण्यात आलेल्या पाठपुराव्याच्या प्रमाणित प्रतीची सुद्धा मागणी केली आहे.

घरकुल मंजूर झाल्याने आनंदी असलेल्या लाभधारकांनी घरकुल बांधकामचे नियोजन केले. घरकुल हप्ते वेळेत मिळतील ही अपेक्षा ठेऊन प्रसंगी खाजगी कर्जे घेऊन घरकुलाचे बांधकाम करून घेतले तर अनेकांचे घरकुलाचे काम अर्धवट आहेत.

अनेक लाभार्थ्यांनी जुने पडके घर पाडल्याने व नवे घरही अनुदानाअभावी पूर्ण झाले नसल्याने बेघर बनल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

घरकुल योजना की बेघर योजना - घरकुल योजनेच्या निमित्याने आम्ही कसेबसे निवास करीत असलेली जुनी घरे पाडून बेघर झालो असून अनुदान रखडल्याने घर बांधकाम पूर्ण झाले नाही. उलट आम्हीच कर्जाच्या खाईत लोटल्या गेलो असल्याने ही घरकुल योजना आहे की बेघर योजना अशा संतप्त प्रतिक्रिया अनेक लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

# आज पासून मुंडेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ.!

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**कंधार धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील मुंडेवाडी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मा.शु १ शके १९४६ दि.३० जानेवारी २०२५ रोज गुरुवार पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होत असून,या अखंड हरिनाम सप्ताहाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुंडेवाडी येथील ग्रामस्थांनी केले आहे. हा सप्ताहाचे दि.३० जानेवारी ते ६ फेब्रुवारी गुरुवार या कालावधीत आयोजन केले आहे.काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता होणार आहे.तरी कंधार तालुक्यातील पंचक्रोशीतील भाविकांनी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा,असे आवाहन सप्ताह कमिटीच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे. या सप्ताहातील मृदंग सेवक हभप.सत्यम महाराजवागदरवाडीकर, गायनाचार्य ह.भ.प. परमेश्वर महाराज कुंडकर,गायनाचार्य ह.भ.प.बबन महाराज कराड राहणार आहेत,या सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमांची रूपरेषा अशी पहाटे ४ ते ६ काकडा आरती भजन, सकाळी ६ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते ०१ गाथा भजन, दुपारी १ ते ३ भावार्थरामायण लक्ष्मण शक्तीचा रोज एक अद्याय, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन ५ ते ६ हरिपाठ,तसेच रात्री ९ ते ११ हरिकिर्तन होणार आहे. व रात्री १२ ते ४ हरिजागर भजन आयोजन करण्यात आले आहे.अखंड हरिनाम सप्ताहातील किर्तनकार व वेळ रात्री ९ ते ११ राहिल दि.३० जानेवारी २०२५ श्री.ह.भ.प. पंढरी महाराज मुरकुटे नांदेड,दि.३१ फेब्रुवारी श्री ह.भ.प.लहुदास महाराज मुरकुटे देवकरा, दि.१ फेब्रुवारी ह.भ.प. वैष्णवी दिदी गित्ते परळीकर, दि.०२ फेब्रुवारी ह.म.प.पुजाताई बडे लातूर,दि.३ फेब्रुवारी श्री.ह.भ.प.नामदेव महाराज दापकेकर,दि.४ फेब्रुवारी श्री. ह.भ.प.कृष्णभक्त गणेश महाराज गुट्टे परळी,दि.५ फेब्रुवारी ह.भ.प.वासुदेव महाराज मुंडे शास्त्री गोपीनाथ गड परळी, दि.६ फेब्रुवारी रोजी काल्याचे किर्तनकार श्री.ह.भ.प.वासुदेव शास्त्री मुंडे गोपीनाथगड परळी यांचे होणार आहे.

# डॉक्टर, इंजिनिअर बनण्याआधी चांगला माणूस बना ! – डॉ. श्रीहरी बुडगेमवार

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**शिवकुमार बिरादार**

मुखेड दि. २७ चिमुकले विद्यार्थी हे या देशाचे उद्याचे भावी नागरिक आहेत. जिजाऊ ज्ञानमंदिर ही शाळा व या शाळेचे संचालक ज्ञानोबा जोगदंड सर आपल्या जिजाऊ परिवाराच्या माध्यमातून तज्ञ व अनुभवी शिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्नातून विद्यार्थ्यांना क्वालिटी शिक्षण देतात. मुलांनो ! चांगला अभ्यास करा. गुरुजनांचा आदर करा. चांगले शिक्षण घेऊन आपल्या क्षेत्रात चांगला नावलौकिक मिळवा. डॉक्टर , इंजिनिअर , अधिकारी , आमदार, खासदार, होण्याआधी चांगला माणूस बना ! असे प्रतिपादन एम.डी. रेडिओलाजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांनी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित बक्षिस वितरण कार्यक्रमात केले. दि. २१ ते २५ जानेवारी दरम्यान जिजाऊ क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन शाळेत करण्यात आले होते. या विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना व संघाला २६ ते २७ जानेवारी रोजी प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत योग्य बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.सलग चार दिवस आयोजित केलेल्या विविध स्पर्धांची व स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने सदरील बक्षिस वितरण दोन दिवसांच्या कार्यक्रमात घ्यावे लागले. विविध क्रिडास्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धानंतर बक्षिस वितरण कार्यक्रमात देशभक्तीपर गीते,




नृत्यस्पर्धा , बालनाटिका , लावण्या , लोकगीते फॅशन शो देशभक्त व घोषवाक्य वाचन आदी विविध गुणदर्शन कार्यक्रम दोन दिवस घ्यावा लागला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक ज्ञानोबा जोगदंड सर तर प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापक जगदीप जोगदंड सर तसेच अतिथी म्हणून पंचायत समिती मुखेडचे शिक्षण विस्तार अधिकारी बाळासाहेब कदम सर , केंद्रप्रमुख शेळके सर , ज्येष्ठ सेवानिवृत शिक्षक साधू मुळके सर , सुप्रसिद्ध युवा सराफा व्यापारी पवन पोतदार , ज्येष्ठ पत्रकार शिवाजी कोनापूरे सर तर दुसऱ्या सत्रात एम.डी. रेडिओलॉजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार , पत्रकार शिवकुमार बिरादार , प्रा. मिलींद गायकवाड सर , तर तिसऱ्या सत्रात राजे छत्रपती अकॅडमीचे संचालक ज्ञानेश्वर डुमणे पाटील , कृषी अधिकारी दिगांबर शेटवाड सर, पालक प्रतिनिधी म्हणून मैनोदीन शेख , चंद्रकांत गोंदलवाड सर , सौ. जायमहेत्रे ताई , देवराज पाटील मसलगेकर सर , चंद्रकांत जाधव सर भानुदास पाटील इंगोले , बालाजी इंगोले , विलासराव जुन्ने पाटील ,दिगांबर पा. इंगोले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आपापल्या वर्गशिक्षिक व शिक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरी ते पहिली पर्यंतच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी फॅशन शो अर्थात फॅन्सी ड्रेस स्पर्धे मध्ये सहभाग नोंदवला होता. युकेजी च्या प्रियांशी , मिताली , शुभ्रा , शरयू . , आहाना शेख , मानसी भद्रे , प्रज्वल , श्रीपाद इंगोले , आर्यन चौधरी , कुणाल शेखावत आदी चिमुकले विद्यार्थी समुहनृत्यात सहभागी झाले होते. अधिराज मस्कले नांगरधारी शेतकरी , अभिनंदन गंगावणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर बनला होता. अशीच अनेक मुले विविध नेताजींच्या वेशभूषेत सहभागी झाली होती. इयता पहिली च्या कनिष्का , राजनंदिनी, आदिनाथ या विद्यार्थ्यांनी समूहनृत्य तर गणेश, आयुश , संगीता या विद्यार्थ्यांनी गीत आणि साईनाथने अभिनय सादर केला. कर चले हम फिदा ... या देशभक्तीपर गाण्यावर इयता दुसरीच्या रुद्र पेड या मुलांने भावस्पर्शी नृत्य सादरीकरण करून रडायला भाग पाडले. समर्थ बंडे, समृद्धी, आणि संचानी सुंदर अशी नाटिका सादर केली. गोविंदराज गोपनर आणि संच यांनी नृत्य सादरीकरण केले. इयता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी संदेशे आते है या गाण्यावर चैताली गोंदलवाड , पूनम चव्हाण , सुविज्ञा मुखेडकर , श्रेया श्रीमंगले श्रेया भालेराव , मोहिनी आगलावे आदी मुलींनी सुंदर नृत्य सादर केले. जिस देश मे गंगा रहता है या गाण्यावर अनाया चौधरी , आलिशा शेख , संस्कृती माकणे , आर्या श्रीरामे , फीर भी दिल है हिंदुस्थानी या गीतावर विहान चव्हाण, शुभम चव्हाण , कृष्णकांत जुन्ने, चैतन्य शिंदे , संगेवार विराज , मयुर गोंड , शौर्य गुट्टे , रितेश जमदाडे द्रोण गव्हाणे, विराट माकणे आदी विद्यार्थ्यांनी चांगल्याच टाळ्या मिळविल्या. सौ सुरेखा राठोड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हे मोबाईलचे दुष्परिणाम दर्शविणारे , विद्यार्थ्यांच्या व मानवी मन , मेंदूवर आक्रमण करणारे घटक याचे भयानक वास्तव या नाटिकेतून सादर केले. त्यात सुमित राठोड, आरुष धनवाडे, संभाजी भोसले, गणेश आचेवाड, आकाश चव्हाण , समर्थ चिंतलवाड , स्वरा तमशेट्टे , संचिता आडे , दिव्या मुळके, गोविंदराज कदम आदी विद्यार्थ्यांनी छान पात्रे वटवून टाळ्या मिळविल्या. चौथीच्या ईश्वरी काळे या मुलीने सुंदर नृत्य सादरीकरण करून जोरदार टाळ्या मिळविल्या. आरोही व दिविजा या मुलींनी समुह नृत्य सादर केले. तिसरीच्या दिव्या मुळके समर्थ मस्कले , सय्यद तहेमीन , पंकजा कराळे या विद्यार्थ्यांनी व्यसनाधिन तरुणाच्या संसाराचे खुप छान नाट्यमय अभिनय सादर केले. पाचवीच्या जान्हवी शिंदे व संचाने समूहनृत्य सादर केले. प्रांजल , रोहिणी या मुलींनी नृत्य सादर केले.रेवा गायकवाड या मुलीने बरसो रे मेघा बरसो या तर उज्ज्वल गायकवाड या मुलाने पुष्पा २ मधल्या गाण्यावर चांगलीच शाबासकी मिळवली. जान्हवी शिंदे या मुलीने संदेशे आते है या गाण्यावर नृत्य करून टाळ्या मिळवल्या . वेदश्री जुन्ने , रिहान शेख यांनी गीत गायले . जाधव मॅडम व गीते मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरी क्लासच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. अधून मधून नृत्य, नाटिका , गीत गायन आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण अशा मिश्र स्वरूपाच्या कार्यक्रमामुळे चांगलीच रंगत वाढली. विविध स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांनी बक्षिसांची अक्षरशः लयलूट केली. विविध स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे विद्यार्थ्यांनी सोने केले. वंदेमातरम् गीत गाऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. मुख्याध्यापक जगदीप जोगदंड यांच्या नेतृत्वात सुधाकर जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचा आरंभ संगीतशिक्षक सचिन सुर्यवंशी सर व विनिता चव्हाण यांच्या स्वागतगीताने झाला. कार्यक्रमाचे बहारदार असे सुत्रसंचलन परविन शेख मॅडम , सायराबानु शेख मॅडम यांनी केले. प्रास्ताविक निरोजा जगताप मॅडम यांनी केले.यावेळी विद्यार्थी पालक बहुसंख्येनी उपस्थित होते.

# स्नेह संवाद मेळावा व खा.रविंद्र चव्हाण यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**मालेगाव संदीप कदम**

विधानसभा निवडणुक २०२४ मध्ये भोकर विधानसभा मतदार संघातील आपण सर्व सहकाऱ्यानी एकजुटीने अपार मेहनत घेतली. आपण सर्वांनी मतदारसंघात पायपीट करून माझ्यासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल मी आपला सदैव ऋणी राहील. तुमच सर्मपण आणि संघर्ष माझ्यासाठी मोठी ताकद आहे. आपण माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यावर जो विश्वास दाखवला त्याला आयुष्यभर तडा जाऊ देणार नाही.माझ्यासाठी झटलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांचे माता-भगिनी,ज्येष्ठ नागरिक व तरुण सहकाऱ्यांचे आभार मानण्यासाठी तसेच नांदेड लोकसभा मतदार संघाचे लोकप्रिय खासदार प्रा.रविंद्र वसंतराव चव्हाण यांचा सत्कार समारंभ संपन्न होणार आहे. या नंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम नियोजित आहे तरी या मेळाव्यास आपण सर्वांनी उपस्थित रहावे ङ्गतिरुपती (पप्पु) पाटील कोंढेकरङ्ग८५ भोकर विधानसभा मतदार संघङ्गदिः ३०/०१/२०२५ गुरुवार सकाळी ११:००वाजता स्थळ : विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालय पिंपळगाव येथे संपन्न होणार आहे तरी सर्वांनी उपस्थित राहावे.



# अट्टल महाविद्यालयाच्या शिबिरात रंगले कवी संमेलन

**भूमिपुत्रांच्या काव्य आविष्काराने श्रोते भारावले**

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**गेवराई, दि. २९, (प्रतिनिधी)**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, मन्यारवाडी - गोविंदवाडी ग्रुप ग्रामपंचायत आणि सहारा बालग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने 'युथ फॉर माय भारत, युथ फॉर डिजिटल लिटरेसी आणि बालविवाह बंदी' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात तिसऱ्या दिवशी रात्री निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. या कवी संमेलनात गेवराई तालुक्यातील प्रतिभावान भूमिपुत्रांच्या काव्य आविष्काराने उंची गाठली. सहारा बालग्राम या अनाथालयात संपन्न झालेल्या या कवी संमेलनासाठी मन्यारवाडी आणि गोविंदवाडी येथील ग्रामस्थही उपस्थित होते, तर गेवराई येथूनही अनेक रसिक - श्रोते मुद्दामहून उपस्थित होते. ङ्गप्रा. राजेंद्र बरकसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कवी संमेलनात बालग्राम वर आधारित कवितांची भावस्पर्शी अनुभूती श्रोत्यांना आली. ङ्गप्रास्ताविक करताना प्रा. अरुण जाधव यांच्या कवितेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर विष्णू खेत्रे यांनी जीवन किती सुंदर आहे आणि चांगले दिवस हरवल्याची भावना कवितेतून व्यक्त केली. 'शिस्त' ही कविता त्यांनी सादर करताना पिढी कशी बरबाद होते आणि आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना कसे पास केले जाते याची खंत व्यक्त केली. शिक्षकाला चिखलाच्या गोळ्याला आकार देण्यासाठी थापटीसुद्धा वापरता येत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांचे चिखलाचे गोळे तयार होतील असेही सुतोवाच त्यांनी केले. कवी वसंत केदार यांनी 'वही' या कवितेतून प्रेम आणि शिक्षण या संदर्भात सुंदर भाष्य केले. त्यांनी सहारा बालग्रामवरही एक बहारदार कविता प्रस्तुत केली. शाहीर विलास सोनवणे यांनी शिक्षणाचे दुःख सांगताना आपल्या कवितेतून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांचे भावविश्व साकार केले. 'मसान' या कवितेतून स्मशान जोग्यांचे बकाल भावविश्व सादर करताना वातावरण गहिवरून गेले. शांभवी बोर्डे या कवयित्रीने 'मी सहारा बोलतोय' ही कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कवयित्री सुरेखा रामदासी यांनी 'मुलगी झाली हो' ही मुलींच्या जीवनाच्या वेदना सांगणारी कविता सादर केली. प्रा. राजेंद्र बरकसे यांनी कवी पंजाब येडे यांची बीड जिल्ह्याचा भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक धांडोळा घेणारी कविता सादर करताना वन्समोर मिळवला.ङ्गडॉ. समाधान इंगळे यांनी सूत्रसंचालन करताना त्यांच्या 'शब्द झाले श्वास' या कवितासंग्रहातील 'पडतात कशी ही स्वप्ने' ही कविता सादर करून युवकांच्या भावविश्वाचे चित्रण केले. बालग्रामचे संचालक संतोष गर्जे यांनी कार्यक्रमाच्या शेवटी कुमार विश्वास आणि अनंत राऊत यांच्या कविता सादर करून श्रोत्यांची दाद मिळवली. ङ्गयाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रदीप दहिंडे, डॉ. दीपक डोंगरे, बालग्रामच्या संचालक प्रीती गर्जे, शालेय समिती सदस्य बाबासाहेब डिंगरे, प्रा. शरद सदाफुले, दिनेश औटे, प्रा. रवी खरात, सचिन मोहिते यांच्यासह शिबिरार्थी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. गणेश सूर्यवंशी यांनी आभार मानले.



## उमरी तालुक्यातील उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी म्हणून श्री महेश खतगावे यांचा सत्कार

लोकनेता न्युज नेटवर्क

**उमरी महेश पडोळे**

आज प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद नांदेड ने आयोजित केलेल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायत मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा सत्कार कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती मीनल करनवाल यांच्या हस्ते ग्रामीण भागात शासनाच्या विविध योजना उत्कृष्टरित्या व प्रभावीपणे राबविल्याबद्दल या वर्षामधून तालुक्यातून एका ग्रामपंचायत अधिकारी ची उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी म्हणून निवड करण्यात आली व त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उमरी तालुक्यामधून ग्रामपंचायत नागठाणा बु. चे ग्रामपंचायत अधिकारी श्री महेश खतगावे यांची निकषाणुसार निवड




करण्यात आली व आज जिल्हा परिषदेमध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला . यावेळी प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले . या निवडीबद्दल श्री महेश खतगावे यांचे पंचायत समिती उमरीच्या वतीने गटविकास अधिकारी श्री व्ही आर अरबडवार ,श्री सुनील मोटरवार व श्री राजेश्वर भुरे विस्तार अधिकारी (पंचायत) , ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे अध्यक्ष श्री जय वनसागरे, सचिव ज्ञानेश्वर कोंडा मंगल व सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्यावतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## संत सोयराबाई: व्यक्तित्व आणि कर्तृत्व ग्रंथाचे प्रकाशन संपन्न!

लोकनेता न्युज नेटवर्क

**सोनपेठ :–**

येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात दिनांक २७ जानेवारी, २०२५ सोमवार रोजी संत चोखामेळा अध्यासन केंद्र पुणे संपादित ''संत सोयराबाई: व्यक्तित्व आणि कर्तृत्व'' या ग्रंथाचे आणि ''चोखोबावाणी'' दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचेङ्गअध्यक्ष मा.श्री. परमेश्वरजी कदम साहेब होते तर संत चोखामेळा अध्यासन केंद्र, पुणेचे संस्थापक श्री सचिन पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, डॉ.मुकुंदराज पाटील यांची विशेष उपस्थिती होती.



इंग्रजी विभागाने आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथाचे सहसंपादक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी केले. प्रमुख पाहुणे आणि संपादक म्हणून बोलतांना श्री सचिन पाटील यांनी वर्तमानात वारकरी संत विचारच महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने तारक असून जात-धर्म द्वेषाचे वातावरण निवळण्यासाठी संत नामदेव, संत सोयराबाई, संत चोखामेळा, संत तुकोबाराय आणि अन्य सर्वच वारकरी संतांचे विचार मोलाचे असून या विचारांची आज नितांत गरज असल्याचे प्रतिपादन केले. या प्रसंगी अध्यक्षीय समारोप करतांना श्री परमेश्वर कदम साहेबांनी वर्तमानात मूलभूत संशोधनाची गरज असून आपण आपल्या भोवतालचा आणि स्वतःचा शोध घेण्याची गरज प्रतिपादन केली. यावेळी श्री पाटील सरांनी संत सोयराबाई ग्रंथाच्या १० प्रति महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.अनंत सरकाळे यांच्याकडे भेट म्हणून दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दिलीप कोरडे यांनी तर आभार डॉ.गणेश जयतपाल यांनी मानले. याप्रसंगी डॉ.कच्छवे सर, डॉ.काळे सर, डॉ.सोनसळे सर, डॉ.कदम सर, डॉ.रनखांब सर, डॉ.वाकणकर सर, प्रा.मगर सर यांच्यासह सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री बाबुराव फड, श्री संतुक परळकर, श्री दत्ता सोनटक्के, श्री चंदू पटके यांच्यासह आदित्य ठाकूर, करण उबाळे या विद्यार्थ्यांनी फोटोग्राफी केली. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले दुर्गा मंडळ आयोजित, वन नाईट शो कबड्डीचे दणदणीत खुले सामने

लोकनेता न्युज नेटवर्क

**सिंदखेड राजा :–** तालुक्यातील किनगाव राजा येथे सावित्रीबाई फुले दुर्गा मंडळ आयोजित कबड्डीचे दणदणीत खुले सामन्याचे आयोजन दिनांक २ फेब्रुवारी रोजी करण्यात आली आहे. यामध्ये प्रथम द्वितीय तृतीय व चतुर्थ अशी चार



बक्षीसाचे नियोजन असून या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संघाने भाग घेऊन आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे यामध्ये भोजनाची व्यवस्था सुद्धा करण्यात आली आहे अन्नदानाची मोफत व्यवस्था वैष्णवी मल्टी सर्विसेस किनगाव राजा मिनेश घिके व असेफ कुरेशी ज्ञानेश्वर जाधव यांनी केली आहे या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये किनगाव राजाचे ठाणेदारसह परिसरातील व गावातील अनेक मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत हा कार्यक्रम दोन फेब्रुवारी रोजी स्वामी कबड्डी प्रांगण किनगाव राजा येथे पार पडणार आहे.नाव नोंदणी साठी पवन झोरे मो.ङ्ग ८९७५१५३७६७ संपर्क साधावा तरी जास्तीत जास्त संघाने भाग नोंदवावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## वानोळा गावात दारूबंदी करिता ग्रामपंचायत ला निवेदन सादरग्राम जन विकास युवा ग्रुप चा पुढाकार




लोकनेता न्युज नेटवर्क

**माहूर : राजकिरण देशमुख**

वानोळा गावात व परिसरात अवैध दारू, मटका जुगार, असे अनेक अवैध धंदे चर्चेचा विषय बनला असून यावर अंकुश लावण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.ङ्गयामुळे गावात भांडण तंटे निर्माण होत आहे. अनेक युवा व्यसनाच्या आहारी जात आहेत.ङ्गअनेक संसार उद्ध्वस्त होत असल्याचे दिसून येत आहे, याबाबत सहकार्य करण्याचे आवाहन ग्राम जन विकास युवा ग्रुप च्या सदस्यांनी केली आहे. यावेळी दारू बंदी, रोजगार हमी योजना, मटका,जुगार, पाणीपुरवठा, आरोग्य या विषयावर आधारित चर्चा झाली. ङ्गयावेळी ग्रामपंचायत चे सर्व अधिकारी, सरपंच सुनिता सिडाम,उपसरपंच अभिजीत राठोड, ग्रामपंचायत सदस्य ,ग्राम जन विकास युवा ग्रुप चे सर्व सदस्य , महिला मंडळ, व समस्त मान्यवर उपस्थित होते.

## बि.व्हि चव्हाण यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान



लोकनेता न्युज नेटवर्क

**उमरी महेश पडोळे**

उमरी सामाजिक, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, साहित्य , सांस्कृतिक, धार्मिक आदी क्षेत्रात त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. उमरी शहराला तालुक्याचा दर्जा मिळणे, रेल्वे रुंदीकरण करणे तसेच उमरी तालुक्यामध्ये सिंचनाची सोय करून शेतकरी समृद्ध होण्याच्या दृष्टीने अनेक वेळा लिखाण केले.

उमरी तालुक्याच्या विकासासाठी विविध विषय आपल्या लेखणीच्या माध्यमातून लावून धरले. त्याचा प्रशासनाकडे तसेच लोकप्रतिनिधींकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. म्हणूनच अशा विविध अंगी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उमरी येथील ज्येष्ठ पत्रकार बि.व्हि. चव्हाण यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देण्यात आला.मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठान उमरी यांच्या वतीने २७ जानेवारी रोजी जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन घेण्यात आले. सदर कार्यक्रमात उत्कृष्ट पत्रकारितेचा २०२५ पुरस्कार सोहळा मुदखेड येथे पार पडला. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते बि.व्हि चव्हाण यांच्या हस्ते उत्कृष्ट पत्रकारिता पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संमेलन अध्यक्ष डॉ. जगदीश कदम हे होते. स्वागत अध्यक्ष प्रवीण गायकवाड, निमंत्रक प्रा. प्रल्हाद इंगोले उपविभागीय अधिकारी प्रवीण मेघ शेट्टी, तहसीलदार अरुण आनंद देऊळकर, पोलीस निरीक्षक वसंत सरपे, संचालक गोविंदराव शिंदे, शंकर राठी, मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठान चे सचीव नागोराव डोंगरे यांचे उपस्थिती होती. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेकांनी श्री. चव्हाण यांचे अभिनंदन केले.

# स्व.मीराबाई खडसे बहुद्देशीय सेवभावी संस्थेच्या संयुक्त विध्यमाने सर्वरोग निदान व उपचार शिबीर वाई येथे सपन्न.

लोकनेता न्युज नेटवर्क

**माहूर :प्रतिनिधी**

दि.:–२८/०१/२०२५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वाई (बा) येथे दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचलित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) स्वर्गीय मीराबाई खडसे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वरोग निदान व उपचार शिबिर संपन्न झाले असून सदर शिबिरात एकूण ८३५ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून एकूण १४५ लाभार्थ्यांना सावंगी (मेघे) वर्धा येथे संदर्भित करण्यात आले आहे. दिलेल्या तारखे मध्ये ( दिनांक:– ०७/०२/२०२५ ला ५० लाभार्थी, दिनांक:–१२/०२/२०२५ ला ५० लाभार्थी तर दिनांक:–१७/०२/२०२५ ला ४५ लाभार्थी एकूण १४५ लाभार्थी.) संदर्भित करण्यात येणार आहे. सर्व रोग निदान व उपचार शिबिराची सुरुवात महामानवाच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पंचायत समिती माजी सभापती तथा ग्रामपंचायत कार्यालय वाई (बाजार) येथील उपसरपंच हाजी उस्मान खान हाजी चांद खान पठाण हे होते, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधानजी जाधव, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ.निरंजन केशवे, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक, काँग्रेस तालुकाध्यक्ष बाळासाहेब देशमुख,वाई ग्रामपंचायतचे तंटामुक्ती अध्यक्ष कैलासजी बेहेरे, स्वर्गीय मीराबाई खडसे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थाचे अध्यक्ष गणेशजी खडसे,सावंगी (मेघे) वर्धा येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजचे प्राध्यापक डॉ. वसंत वाघ, केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शर्मिला कार्लेकर,तालुका आरोग्य विस्तार अधिकारी आर.एस.गावंडे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी लक्ष्मण जोगपेठे,औषधनिर्माण अधिकारी एस.पी.ढगे, डॉ. झनक मानकर,डॉ.पंकज टनमने,ग्रामपंचायत सदस्य प्रकाश खडसे, फिरोज खान हैदर खान पठाण, आतिश वामन शिंदे,सामाजिक कार्यकर्ते अमजद खान आझाद खान पठाण तसेच उदय नाईक हे होते. शिबिरात स्त्रीरोग तज्ञ, ईसीजी विभाग, मेडिसिन तज्ञ, बारोग तज्ञ,सर्जरी तज्ञ,नेत्ररोग तज्ञ तसेचअस्थिरोग तज्ञ यांच्याकडून लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली, यामध्ये कम्युनिटी मेडिसिन डॉ. वसंत वाघ,डॉ.पंकज जांभुळकर, डॉ. दिव्या पाणीकर, डॉ. अमन त्रिपाठी, डॉ.सोनिया रांजण,डॉ.आकाश वडबुधे.मेडिसिन डॉ अभिनव कदम,डॉ. वामशी कृष्णा,डॉ. विराज वदरा, बालरोगतज्ञ डॉ प्रशांत खरतडे,डॉ.उन्मेषा पटेल. सर्जरी डॉ रिद्धी ठाकूर,डॉ. अमित पाल. स्त्री रोग तज्ञ डॉ. अदिती सिंग ठाकूर, डॉ. नूतन. नेत्ररोग तज्ञ डॉ.अदिती कुलकर्णी,डॉ कुणाल भट तर अस्थिरोग तज्ञ डॉ.अभिषेक चौधरी व डॉ.रोहित रानडे होते कार्यक्रम यशस्वी साठी सांगवी (मेघे) येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ.गंगाधर तडस, डॉ.नितेश बुरबुरे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक देविदास राठोड, आरोग्य सहायिका,आरोग्य कर्मचारी( स्त्री/ पुरुष) इतर कर्मचारी वर्ग, स्वर्गीय मीराबाई खडसे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या सदस्या सौ.पूजा आशिष खडसे, आशिष गणेश खडसे,हरडप येथील सामाजिक कार्यकर्ते समाधान मुनेश्वर यांनी विशेष परिश्रम घेतले होते कार्यक्रमाचे प्रस्तावना आशिष गणेश खडसे यांनी केले सूत्रसंचलन सामाजिक कार्यकर्ते सुभाषभाऊ खडसे यांनी केले तर आभार प्रदर्शन केंद्राचे आरोग्य सहाय्यक देविदास राठोड यांनी मानले.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904